स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंटरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

पान नं.

दिनांक : २२/०८/२०२५ रोजी झालेल्या महिला सभा बैठकीचे इतिवत्त नोंदवही.

१) ग्रामपंचायतीचे नांव : हिंजवडी ता. मुळशी जि. पुणे नोंदवही.

२) सभेची वेळ : दुपारी ०२:०० वाजता

४) सभेची तारीख : २२/०८/२०२५

५) सभेचे स्थळ : श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, हिंजवडी

३) सभेचा क्रमांक : ०२

६) सभेचे कोणी मान्यवर अधिकारी हजर असल्यास त्यांची हुद्दयासह नाव :

७) सभेचे अध्यक्ष मान्यवर :- श्री. गणेश बन्सीलाल जांभुळकर (मा. सरपंच सो)

दिनांक : २२ /०८ /२०२५ रोजी मा. श्री. गणेश बन्सीलाल जांभुळकर (सरपंच) / यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महिला

बैठक / सभेमधील उपस्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | सभेस उपस्थित अधिकारी / कर्मचाऱ्याचे नाव | हुद्दा | भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. गणेश बन्सीलाल जांभुळकर | सरपंच | ९८८१५३०८७९ | | (signature) |
| २ | श्री. सोमा प्रभु खैरे | ग्रा.पं. अधिकारी | ९९२३४९५१३२ | | (signature) |
| ३ | | | | | |
| ४ | सौ. शिवानी अभिषेक जांभुळकर | सदस्या | ८८८८०२३२६५ | | S.Jambhulkar |
| ५ | सौ. ऐश्वर्या प्रशांत वाघमारे | सदस्या | ९६०४८१९७८८ | | A.P.Waghmare |
| ६ | सौ. प्राजक्ता सचिन गांगवणे | सदस्या | ९८८१६६९७५२ | | Pallavi |
| ७ | सौ. मनिषा जयसिंग हुलावळे | सदस्या | ९६०४६८६३९१ | | M.S. Hulawe |
| ८ | | | | | |
| ९ | | | | | |
| १० | | | | | |
| ११ | | | | | |
| १२ | | | | | |
| १३ | | | | | |
| १४ | | | | | |
| १५ | | | | | |
| १६ | | | | | |
| १७ | | | | | |
| १८ | | | | | |
| १९ | | | | | |

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंटरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

पान नं. 01

तालुका मुळशी जिल्हा पुणे

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | अ.क्र. | नाव | सही |
| | ७) | सौ. सविता अल्हासराव देशमुख (आशावर्कर) | Sdeshmukh |
| | ८) | "— ताराबाई हिरामण जाधव | ता हि जाधव |
| | ९) | सौ. शोभा प्रल्हाद पवार (अं. सेविका) | [signature] |
| | १०) | श्रीम पवार अश्विनी प्रल्हाद (न्यु इं. स्कूल व ज्यु.कॉ) | Alawar |
| | ११) | सौ ज्योत्स्ना सुनिल पाटोळे (अं. सेविका) | Spatole |
| | १२) | सौ वर्षा सचिन सोनवणे (अं सेविका) | [signature] |
| | १३) | सौ अंजना धनराज वाघमारे अं सेविका | Anjana |
| | १४) | सौ. वैशाली सुनिल ताकवले | [signature] |
| | १५) | सौ वर्षा पुंडलिक देवकर (अंगणवाडीसेविका) | Devkar |
| | १६) | श्रीम. स्वाती रामचंद्र परदेशी | [signature] |
| | १७) | सौ. निलम शिरसे | Nshirse |
| | १८) | सविता रविंद्र शिंदे (अं. सेविका) | Sshinde |
| | १९) | सौ. माधुरी दत्तात्रय थोरात (CRP) | M.D.Thorat |
| | २०) | सौ. माधुरी प्रमोद जगताप. | M.P.Jagtap |
| | २१) | शितल संदिप कदम | SSK |
| | २२) | वंदना राजु पाटील | VRPatil |
| | २३) | सुलोचना संभाजी साखरे | सु. सं. साखरे |
| | २४) | सुवर्णा सुधीर गराडे | SSG |
| | २५) | आशा किशोर साखरे | Askhare |
| | २६) | शुभांगी वैभव साखरे | SSSakhare |
| | २७) | मुक्ता विश्वनाथ साखरे | मुक्ता वि. साखरे |
| | २८) | र. गु. कांबळे | र. गु. कांबळे |
| | २९) | दिपाली अविनाश देवकर | D.A.Devkar |

आज दि. २१/०८/२०२५ रोजी घेण्यात आलेल्या महिला सभेस वरील प्रमाणे महिला उपस्थित झालेनंतर सभेचे मा. अध्यक्ष श्री. गणेश बन्सीलाल जांभुळकर यांचे परवानगीने सभेचे कामकाज चालू आले ते पुढीलप्रमाणे असे.

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंटरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०१

# इतिवृत्त नोंदवही



ग्रामपंचायत हिंजवडी

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| १ | | मागील सभेच्या कामकाजाचे प्रोसेडींग वाचुन कायम करणे. | |
| | ४ | आजच्या महिला सभेत ग्रामपंचायत मागील महिला सभा दि. १९।०५।२०२५ रोजी घेण्यात आलेल्या महिला सभेचा वृत्तांत (प्रोसेडींग) विस्तृतपणे वाचून दाखविण्यात आले त्यामध्ये घेण्यात आलेल्या विषयाबाबत आणि ठरावाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व याबाबत निर्णय कायम करण्यात आले व मागील सभेचा वृत्तांत (प्रोसेडींग) वाचून कायम करणेबाबतचा ठराव मंजुर करण्यात आला असे.<br>सुचक : वर्षा सचिन सोनवणे<br>अनुमोदक : सविता उल्हासराव देशमुख<br>ठराव सर्वानुमते मंजुर | |
| २ | | महिलांच्या अडीअडचणीं बाबत चर्चा करणे. | |
| | ५ | आज दि. २२।०८।२०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या महिला सभेत महिलांच्या अडी अडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली ती पुढीलप्रमाणे.<br>अंगणवाडी बाबत :-<br>आजचे महिला सभेस उपस्थित अंगणवाडी सेविका सौ. शोभा प्रल्हाद पवार अंगणवाडी क्र. २ यांनी अंगणवाडी क्र. १ ते ६ मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना गणवेश, बूट, मोजे, दप्तर आणि पी.टी. ड्रेस मिळणेबाबत मागणी केली असता सदरच्या | |

स्टार सोल्युशन अँण्ड गीता एंन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे – ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

पान नं. 02

तालुका मुळशी जिल्हा पुणे

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | विषय मासिक सभेमध्ये घेऊन योग्य निर्णय घेण्यात येईल असे सांगितले. तसेच पावसाळ्यामुळे अंगणवाडीतील किचन मध्ये गळती होत आहे तरी सदरची किचन गळती काढून मिळावी असे सुचाविले असता संमांधित ठेकेदारास सदरची गळती काढण्यासाठी सूचना देण्यात येतील असे सभेच्या अध्यक्षांनी सांगितले<br>आजचे महिला सभेस उपस्थित अंगणवाडी सेविका सौ. अंजना धनराज वाघमारे अंगणवाडी क्र. प्र यांनी साखरे वस्ती या अंगणवाडीला भेट देणेस विनंती केली असता सदरच्या अंगणवाडीला भेट देऊन काही अडी अडचणी असतील त्या दूर करण्यात येतील असे सभेच्या अध्यक्षांनी सांगितले.<br>पाणीपुरवठा बाबत :-<br>आजचे महिला सभेस उपस्थित सौ. ताराबाई हिरामण जाधव यांनी साईबाबा मंदिर जवळ वेताळ नगर हिंजवडी येथे त्यांच्या राहत्या घरी पाणीपुरवठा लाईन जोडणे बाबत मागणी केली. तसेच नंदाबाई आणि अंजना वाघमारे यांना गावठाण लक्ष्मी माता मंदिर जवळ पाणीपुरवठा करणेबाबत मागणी केली असता समंधित ठेकेदारास याबाबत सूचना देण्यात येतील असे सभेच्या अध्यक्षांनी सांगितले.<br>स्वच्छते बाबत :- | |

# इतिवृत्त नोंदवही

स्टार सोल्युशन ॲण्ड गीता एंटरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/ ९६७३७२४६०९

पान नं.

ग्रामपंचायत हिंजवडी

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | आजचे महिला सभेस उपस्थित बचत गट सी.आर.पी.सौ. माधुरी दत्तात्रय थोरात यांनी अंगण-वाडीच्या बाजूला जे वॉशरुम आहे तेथे खूपच दुर्गंधी येते तरी सदरच्या ठिकाणी स्वच्छता राखणेसाठी सफाई कर्मचारी ठेवावा अशी मागणी केली असता याबाबत मासिक सभेत चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल असे सांगितले. | |
| | | अशा प्रकारे आज दि.२२/०८/२०२५ रोजी आयोजित महिला सभेमध्ये महिलांच्या अडीअडचणींबाबत चर्चा करण्यात आली व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला. | |
| | | सुचक :- शोभा प्रल्हाद पवार | |
| | | अनुमोदक :- अंजना धनराज वाघमारे | |
| | | ठराव सर्वानुमते मंजुर | |
| ३ | | समाजात एकल महिलांबाबत प्रचलित असलेल्या अनिष्ट रुढी परंपरा प्रथे विरुध्दचा ठराव पारित करणे. | |
| | ६ | मौजे हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे येथे आज दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित महिला सभेत समाजात एकल महिलांबाबत प्रचलित असलेल्या अनिष्ट रुढी परंपरा प्रथे विरुध्द चर्चा करण्यात आली. एकट्या राहणाऱ्या परित्यक्ता, घटस्फोटीत, विधवा, अपंग किंवा अविवाहित महिलेला एकल महिला म्हणतात. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त | |

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

पान नं. 03

तालुका मुळशी जिल्हा पुणे

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | सरकारने एकल महिला पुनर्वसन हा कार्यक्रम हाती घेतला आहे. पंचायत समिती मुळशी. पौड, ग्रामपंचायत विभाग, जाक्र. पंच / वशी / /२०२५ दि. ३०/०७/२०२५ विषय : गाव पातळीवरील एकल महिला (विधवा, परित्यक्ता व अन्य कारणाने एकट्या) यांची माहिती संकलित करुन भरणेबाबत व एकात्मिक बाल विकास सेवा योजना, पुणे जिल्हा परिषद पुणे जा. क्र. एबाविसेयो / कार्या-२ / /२०२५ दिनांक-०१/०८/२०२५ विषय : समाजातील एकल महिलांची विहित नमुन्यामध्ये माहिती संकलित करणेबाबत या दोन शासन परिपत्रकाचे वाचन आजच्ये महिला सभेत करण्यात आले आणि त्यानुसार एकल महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता आहे का ? तसेच कोणती योजना एकल महिलांसाठी सध्या सर्वात जास्त महत्वाची आणि गरजेची वाटते याबाबत अंगणवाडी सेविका मदतनीस, आशा सेविका यांचे मार्फत प्रत्यक्ष गृहभेटीद्वारे समक्ष माहिती विहित नमुन्यामध्ये संकलित करण्यात आलेली आहे आणि एकल महिला माहिती संकलन - पुणे जिल्हा परिषदच्या दिलेल्या लिंक वरती एकल महिलांचे सर्वेक्षण अर्ज ग्रामपंचायत कर्मचारी यांनी ऑनलाईन भरलेले आहेत असे सभेच्या अध्यक्षांनी सांगीतले. आजच्ये महिला सभेत शासन | |

स्टार सोल्युशन अँण्ड गीता एंटरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/ ९६७७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

पान नं.

ग्रामपंचायत हिंजवडी

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | परिपत्रक क्रमांक: व्हीपीएम-२०२२/प्र.क्र. ७९२/पं.रा.-३ बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, मुंबई, तारीख: १७ मे २०२० चे शासन परिपत्रक वाचन करण्यात आले व समाजात एकल महिलांबाबत प्रचलित असलेल्या अनिष्ट रुढी परंपरा प्रथे विरुध्द मुद्दा उपस्थित करण्यात आला. आज विज्ञानवादी व प्रगतीशील समाज म्हणून आपण वाटचाल करत असलो तरीही, आजही समाजात विधवा प्रथे-सारख्या अनिष्ट प्रथा प्रचलित असल्याचे आढळून येते. पतीच्या निधनावेळी पत्नीचे कुंकू पुसणे, गळ्यातील मंगळसूत्र तोडणे, हातातील बांगड्या फोडणे, पायातील जोडवी काढली जाणे यांसारख्या कुप्रथांचे समाजात पालन केले जाते. पतीचे निधन झाल्यानंतर त्याच्या पत्नीला विधवा म्हणून समाजात वावरत असताना अवहेलनेस सामोरे जावे लागते. या महिलांना पती निधनानंतर समाजात कोणत्याही प्रकारच्या धार्मिक व सामाजिक कार्यक्रमात सहभागी होवू दिले जात नाही. या कुप्रथांचे पालन होत असल्याने अशा व्यक्तींना प्रतिष्ठेने जीवन जगण्याच्या मानवी अधिकाराचे तसेच भारतीय संविधानाने बहाल केलेल्या समानतेच्या हक्काचेही उल्लंघन होते. त्यामुळे अशा प्रथेचे निर्मुलन होणे ही काळाची गरज आहे. सदर महिलांना इतर महिलांप्रमाणे सन्मानाने जगण्याचा | |

स्टार सोल्युशन ॲण्ड
गीता एंटरप्रायजेस
पिरंगुट, पुणे – ४१२ ११५
मोबा. नं. ९९८९४८८००७/
९६७३७२४६०१

# इतिवृत्त नोंदवही

पान क्र. 04

तालुका मुळशी जिल्हा पुणे

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | पूर्ण अधिकार आहे. यामुळे अशा प्रथांचे निर्मुलन होणे आवश्यक आहे. अशा कुप्रथांचे पालन करणे अनुचित आहे यासाठी अशा एकल महिलांशी कोणताही दुजाभाव न करता या महिलांना धार्मिक व सामाजिक कार्यक्रमात सहभागी करून घेणेचे तसेच पतीच्या निधनावेळी पत्नीचे कुंकू पुसणे, गळ्यातील मंगळसूत्र तोडणे, हातातील बांगड्या फोडणे, पायातील जोडवी काढली जाणे यासारख्या कुप्रथांना विरोध करून त्याबाबत जनजागृती करून त्याची अंमलबजावणी करण्याचे सर्वानुमते ठरले. अशा प्रकारे आजचे महिला सभेत समाजात एकल महिलांबाबत प्रचलित असलेल्या अनिष्ट रूढी परंपरा प्रथे विरुध्द चर्चा करण्यात आली व अनिष्ट रूढी परंपरा प्रथे विरूध्द चर्चा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. | |
| | | सुचक :- सविता रविंद्र शिंदे | |
| | | अनुमोदक :- वर्षा पुंडलीक देवकर | |
| | | ठराव सर्वानुमते मंजुर. | |
| ४ | | ग्रामसभेतील विषयांवर चर्चा करणे. | |
| | ७ | आजच्या महिला सभेत दि. २६।०८।२०२५ रोजी होणाऱ्या ग्रामसभेतील प्रत्येक विषयाचे वाचन करण्यात आले. ग्रामसभेत घेण्यात येणारे विषय खालीलप्रमाणे आहेत. | |
| | | १) मागील सभेच्या कामकाजाचे प्रोसेडींग वाचुन कायम करणे. | |
| | | २) माहिती अधिकार अर्जाचे वाचन | |

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही



ग्रामपंचायत हिंजवडी

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अंमलबजावणी |
|---|---|---|---|
| | | करणे. | |
| | | ३) नालसा ग्रासरूट इन्फॉर्मेशन अँड ट्रान्सपरन्सी इनिशिएटिव्ह न्याय जागरूकता योजना २०२५ माहितीपत्राचे वाचन करणे बाबत. | |
| | | ४) समाजात एकल महिलांबाबत प्रचलित असलेल्या अनिष्ट रूढी, परंपरा, प्रथे विरुध्द ठराव पारित करणे व शपथ घेणे बाबत. | |
| | | ५) घनकचरा, सांडपाणी व प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी बंधीत निधीला तरतूद केलेल्या कामांबाबत चर्चा करणे. | |
| | | ६) राष्ट्रीय लोक अदालत दिनांक १३ सप्टेंबर २०२५ बाबत. | |
| | | ७) श्री संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी (७५०) जयंती साजरे करणे बाबत. | |
| | | ८) टी. बी. मुक्त पंचायत मोहिमेची जन जागृती करणेबाबत. | |
| | | ९) आर्थिक समावेशन योजना करता ग्रामपंचायत स्तरावर ३ महिन्यांसाठी पूर्ण व्याप्ती मोहीम बाबत. | |
| | | १०) बालविवाह रोखण्यासाठी प्रतिज्ञा घेऊन विविध उपक्रम राबविणे. | |
| | | ११) माझी वसुंधरा अभियान अंतर्गत सहभाग घेवून शासन निर्णयानुसार काम करणे. | |
| | | १२) म.गा.रा.ग्रा.रो.ह. योजने अंतर्गत लेबर बजेट तयार करणे. | |
| | | १३) हर घर तिरंगा अभियाना बाबत. | |

स्टार सोल्युशन अँण्ड गीता एंन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/ ९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

पान नं. 05

तालुका मुळशी जिल्हा पुणे

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अंमलबजावणी |
|---|---|---|---|
| | | १४) जागतिक तंबाखू नकार दिवस २०२५ निमित्त धूर मुक्त किंवा तंबाखू मुक्त गाव मोहिम राबविण्याबाबत. | |
| | | १५) जन सुरक्षा मोहिम राबविणेबाबत प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री जिवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना. | |
| | | १६) धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत करावयाच्या कामांना मंजुरी घेणेबाबत. | |
| | | १७) मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविणे बाबत. | |
| | | १८) पंचायत विकास निर्देशांक (PAI २.०) बाबत. | |
| | | १९) ऐनवेळचे मान्यवर अध्यक्षांचे परवानगीने येणारे विषय. | |
| | | येणेप्रमाणे आजचे महिला सभेत दि. २६।०८।२०२५ रोजी होणाऱ्या ग्रामसभेतील अजेंड्यातील प्रत्येक विषयाचे वाचन करण्यात आले त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली त्यामध्ये घेण्यात आलेल्या प्रत्येक विषयाची सर्वानुमते चर्चा करण्यात येऊन सदस्य विषयांची ग्रामसभेत चर्चा करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले व ठराव सर्वानुमते कायम केला असे. | |
| | | सुचक : मा. अध्यक्ष सो. | |
| | | ठराव सर्वानुमते मंजूर. | |
| | | येणेप्रमाणे आज दि. २१।०८।२०२५ | |

| स्टार सोल्युशन अँण्ड गीता एंटरप्रायजेस पिरंगुट, पुणे - ४१२ ११५ मोबा. नं. ९६८९४८८००७/ ९६७३७२४६०९ | इतिवृत्त नोंदवही | पान नं. |
|---|---|---|

ग्रामपंचायत हिंजवडी

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | शेवटी बोलाविण्यात आलेल्या महिला सभेचे अध्यक्ष मा. सरपंच श्री. गणेश बन्सीलाल जांभुळकर यांनी उपस्थित महिलांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहिर केले. | |
| | | ग्रामपंचायत अधिकारी सरपंच<br>ग्रामपंचायत हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे | |